वैद्यकिय अधिक्षक कार्यालय,
डॉ.पंजाबराव देशमुख रूग्णालय व अनुसंधान केंद्र, अमरावती.

Phone No.0721-2662323 Ext.- 206, 207
Fax-0721-2661742, Web:- www.pdmmc.com
Email ID:- drpdhrc2015@rediffmail.com

NABH Cer. NO :- PEH-2021-1399

जा.क्र./ PDHRC/577/२०२६ दि.२६.०२.२०२६

# निविदा सुचना

या निविदा सुचने द्वारे सर्व लॉड्री कंत्राटदारांना सुचित करण्यात येते की, डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृत्ती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील लॉड्रीची जागा कंत्राट पध्दतीवर चालविण्याकरीता पंजीबध्द कंत्राटदारांकडून द्वी-लखोटा पध्दतीने सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| निविदा फॉर्म विक्रीचा कालावधी | दि.२८.२.२०२६ ते दि.७.३.२०२६ चे सायंकाळी ४ पर्यंत (वैद्यकीय अधिक्षक कार्यालयात) |
| फॉर्म भरून जमा करण्याची अंतिम तारीख | दि.०९.०३.२०२६ (सोमवार) चे सायंकाळी ४ पर्यंत |
| निविदा उघडण्याची तारीख | दि.१२.०३.२०२६ (गुरुवार) सकाळी ११.०० वाजता. |
| अनामत राशी (EMD) | रु.१,००,०००/- (एक लाख फक्त) चा D.D. |

कारण न दर्शविता एक अथवा सर्व निविदा स्वीकारने किंवा रद्ध करण्याचा अधिकार महाविद्यालय प्रशासने राखून ठेवला आहे. निविदा सुचना बाबतची सविस्तर माहिती/ अटी शर्ती वैद्यकीय अधिक्षक कार्यालयात उपलब्ध करून देण्यात येईल. निविदा सुचना बाबतची सविस्तर माहिती कंत्राटदारांना महाविद्यालयाच्या वेब साईट http://pdmmc.ac.in (नोटीस बोर्ड) वर दि.२८.२.२०२६ पासून पाहता येईल.

वैद्यकीय अधिक्षक
डॉ.पं.दे.रुग्णालय,अमरावती

अधिष्ठाता
डॉ.पं.दे.वै.महाविद्यालय,अमरावती

---

प्रती,
मा. संपादक,
-----------------------,
अमरावती.

महोदय,

उपरोक्त जाहिरात आपल्या दैनिक वृत्तपत्रात प्रसिद्धीस द्यावी.

वैद्यकीय अधिक्षक
डॉ.पं.दे.रुग्णालय,अमरावती

अधिष्ठाता
डॉ.पं.दे.वै.महाविद्यालय,अमरावती

## महाविद्यालयाच्या अटी व शर्ती
## (कपडे धुलाई / लॉंड्री करीता )

१. डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय येथे कंत्राट पध्दतीवर कपडे धुलाई /लॉंडी चालविण्याचा कंत्राट दि. ________________ ते दि. ________________ पर्यंत (१२ महिने) राहील.

२. कपडे धुलाई / लॉंड्री करीता जागा महाविद्यालय परीसरामध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. कपडे धुलाई करीता लागणा-या यंत्र सामुग्री /मशिनरीजची (Washer Extractors, Hydro Extractor, Flatwork Ironers / Calendaring Machines, Drying Tumbler, Laundry Trolleys or Carts and etc व्यवस्था करणे व त्यामध्ये काही बिगाड झाल्यास ते त्वरीत दुरूस्त करून घेण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहिल. यंत्र सामुग्रीच्या नादुरूस्तीमुळे कपडे उशिरा धुवून मिळाल्यास, त्यासाठी देण्यात येणारे कोणतेही कारण ग्राहय न धरता कंत्राटदाराकडुन दंड स्वरूपात प्रती दिवस रू.२००/- आकारण्यात येतील व सदर दंड रक्कम त्यांच्या मासिक बीलामधुन कपात केल्या जाईल.

३. कंत्राटदारास कपडे धुलाई करीता वापरण्यात येणारे पाणी व विद्युतचे बील दर महिन्याच्या ५ तांरखे पर्यंत महाविद्यालयाला जमा करणे बंधनकारक राहिल.

४. कपडे अस्वच्छ धुवून मिळाल्यास, त्या साठी देण्यात येणारा मोबदला हा प्रती नग करीता ठरविण्यात आलेल्या दरानुसार मासिक बीलामधुन कमी करून अदा केल्या जाईल. कपडे धुलाईच्या कामात सिस्टर इनचार्ज / विभागप्रमुख / इनचार्ज यांच्या कडुन कपडे धुलाईशी संबंधीत तक्रार प्राप्त झाल्यास व त्यानंतर आपणास त्याबाबतीत ताकीद देवुनही कपडे धुलाईच्या कामामध्ये सुधारणा न झाल्यास आपला सदर करार कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता रद्द करण्यात येईल.

५. कपडे धुलाई करीता लागणारे स्वच्छता साहित्य जसे- डिटर्जंट पावडर, साबन व ईत्यादी महाविद्यालय व रूग्णालया मार्फत पुरविण्यात येणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहिल.

६. सुरक्षा ठेव रक्कम रू. १,००,०००/- (अक्षरी-एक लाख फक्त) किंवा त्यावर चर्चा झाल्यानंतर ठरविण्यात आलेली राशीचा डी.डी. मा. अधिष्ठाता, डॉ.पं.दे. वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांचे नावे कंत्राट मिळाल्या पासुन दोन दिवसाच्या आत जमा करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहिल. अन्यथा निविदा रद्द करण्यात येईल.

७. १८ वर्ष पेक्षा कमी व ६० वर्षा वरील व्यक्ती कामावर ठेवता येणार नाही. त्या करीता कंत्राटदारांनी कामगारांच्या आधार कार्ड वरील नमुद जन्म तारखेची पाहणी करूनच त्यांना कामावर ठेवावे. तसेच कामगारांना आठ तास पेक्षा जास्त काम करता येणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहिल.

८. धुलाई करीता देण्यात येणारे कपडे चोरीला गेल्यास त्याची भरपाई करून देण्याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहिल.

९. धुलाई साठी कपडे घेवुन जाणे व परत आणण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहिल. विविध विभाग / वार्ड मधुन देण्यात येणा-या कपडयांची अदलाबदल होणार नाही, याची दक्षता घेणे कंत्राटदाराची जबाबदारी राहिल.

१०. लॉंड्रीचा परीसर साफ सफाई ठेवणे कंत्राटदाराला बंधनकारक राहिल.

११. कंत्राटदाराला कपडे धुलाई करीता उपलब्ध करून देण्यात आलेल्या जागेत आग किंवा काही आर्थिक नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई करुन देणे कंत्राटदाराला बंधनकारक राहिल.

१२..कराराबाबत कोणतीही कायदेशीर कार्यवाही करावयाची असल्यास त्याचे कार्यक्षेत्र अमरावती न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात असणे बंधनकारक राहिल.

वर नमुद अटी शर्ती मला मान्य आहे.

स्वाक्षरी

..........................

कंत्राटदाराचे नाव व पत्ता

# निविदा अटी व शर्ती
## ( कपडे धुलाई / लॉंड्री करीता)

१. कंत्राटची मुदत दि.________________ ते दि.________________ पर्यंत एक वर्ष राहिल.

२. कोरी निवीदा फार्मची कीमत रू. १०,०००/- अक्षरी- दहा हजार फक्त परत न मिळणारी असुन कोरी निविदा फॉर्म दि.________________ ते दि.________________ पर्यंत वैद्यकीय अधिक्षक कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळेल.

३. भरुन दिलेल्या निविदा फॉर्म दि.________________ ला दुपारी ________ वाजे पर्यंत वैद्यकीय अधिक्षक कार्यालयात स्वीकारण्यात येतील.

४. निविदा द्वि-लखोटा पध्दतीने (Technical Bid & Financial Bid) दयाव्यात. अन्यथा निविदांचा विचार करण्यात येणार नाही.

५. लीफाफा क. १ वर तांत्रिक लीफाफा असे स्पष्ट लीहावे. त्या लीफाफयात खालील प्रमाणपत्रांच्या प्रती असाव्यात व त्यातील प्रत्येक पानाला अनुक्रमे नंबरींग दयावे.
१) कपडे धुलाई / लॉडी कंत्राटाकरीता अनामत रक्कम भरण्याबाबतचा धनाकर्ष डी.डी रू. १,००,०००/- अक्षरी- एक लाख रूपये फक्त तसेच असुन ते मा. अधिष्ठाता, डॉ. पंजाबराव देशमुख महाविद्यालय यांच्या नावाने जमा करावा लागेल. अन्यथा निविदा ग्राहय धरण्यात येणार नाही. २) शॉप एक्ट रजिस्टेशन सर्टीफिकेट ३) ई.पी.एफ. सर्टीफीकेट ४) पी.टी.रजिस्टेशन सर्टीफिकेट ५) ई.एस.आय.सी. सर्टीफीकेट ६) मागील दोन वर्षाचे इनकमटॅक्स सर्टीफिकेट ऑडीट रीपोर्टसह ७) पॅन कार्ड ८) जी.एस.टी रजिस्टेशन प्रमाणपत्रा व शेवटच्या तीन महिन्याचे रीटर्न चालानसह ९) अनुभव प्रमाणपत्र १०) लेबर लायसंस (लागु असल्यास)

६. ज्या एजन्सी कडे आवश्यक कागदपत्र उपलब्ध असतील अशाच एजन्सीचे निविदा सादर करावी. आवश्यक पत्रांच्या अभावी कंत्राटदाराची निवीदा अपात्र ठरवुन रद्य करण्यात येईल. तसेच ज्या एजन्सीचे नाव शासकीय, निम शासकीय कार्यालयाच्या काळया यादी मध्ये समाविष्ट करण्यात आले असल्यास किंवा पात्र ठरवुन करारनामा रद्य केला असेल अशा एजन्सीने निवीदा सादर करू नये. जर केल्यास त्याची निवीदा रद्य करण्यात येईल व त्याची अनामत रक्कम (EMD) परत करण्यात येणार नाही.

७. लीफाफा क. २ वर प्रमुख / आर्थिक (Financial Bid) लीफाफा असे स्पष्ट लीहावे. यात दरा संबंधी निविदा दयावी. दर आकडयात व अक्षरात स्पष्ट लीहावेत. लीफाफा क १ व २ ( Technical Bid & Financial Bid) हे एका दुस-या मोठ्या लीफाफयात टाकुण त्यावर कोणत्या वर्गवारी करीता निविदा सादर करीत आहात, याचा स्पष्ट उल्लेख करावा.

८. तांत्रिक लिफाफा क्र. १ प्रथम उघडण्यात येईल. त्यातील तांत्रिक अटी शर्तीचे दस्तएवज (मुद्या क्र.५ मधिल) योग्य असल्यासच लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल. अन्यथा निविदा रद्य करण्यात येईल.

९. . कंत्राटदारामार्फत लावलेल्या कोणत्याही कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीचा तरतुद (१३%) टक्के किंवा लागु असेल त्याप्रमाणे एम्लॉयर शेअर, ए.डी.एम चार्ज, टिडीएस चार्जेस, जी.एस.टी ठेकेदारास स्वत:करावी लागेल. कंत्राटदारा मार्फत कामावर लावलेल्या कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधिकरीता महाविद्यालय रूग्णालय प्रशासन कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

१०. कंत्राटदाराला लॉड्री येथील कामगारांचा इंडेमिनीटी विमा उतरविने बंधनकारक राहील.

११. कपडे धुलाई कंत्राटदाराने लहान व मोठे कपडयांकरीता प्रती नग प्रमाणे कपडे धुलाई चे दर निविदा फॉर्म मध्ये नमुद करावे.

१२. कंत्राटदाराची निवीदा संस्थेच्या अटी व शर्ती नुसारच असावी. निविदाधारक आपल्या अटी व शर्ती लावु शकणार नाही.

१३. निविदा स्वीकारण्याचे पुर्ण अधिकार महाविद्यालय/रूग्णालय प्रशासन यांना राहिल. त्यावर कुठलीही सबब राहणार नाही.

१४. निवीदा बाबती प्रक्रिया पुर्ण झाल्या नंतर निवीदा सोबत भरलेली अनामत रक्कम अस्वीकृत निविदाधारकांना एक महिन्या नंतर परत करण्यात येईल.

स्वाक्षरी

........................

कंत्राटदाराचे नाव व पत्ता